# प्रेसनोट दि.३०/१२/२०२२

## पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाकडील वाहतुक शाखेमार्फत दिनांक २९/१२/२०२२ रोजी राबविण्यात आलेल्या विशेष मोहिमेबाबत

पिंपरी चिंचवड आयुक्तालयाचे कार्यक्षेत्रात चाकण, भोसरी, तळेगाव हि औद्योगिक क्षेत्रे तसेच हिंजवडी, तळवडे, चिखली ही आयटी पार्क क्षेत्रे आहेत. सदर क्षेत्रामध्ये काम करणारांची संख्याही मोठी असुन परिसाराचा विकासही झपाट्याने होत आहे. पिंपरी चिंचवड शहरामध्ये नागरिकांचे जिवीताचे व मालमत्तेचे रक्षण करण्यास पिंपरी चिंचवड वाहतुक शाखा हि कटीबद्ध आहे.

दिनांक १/१/२०२३ रोजी येणाऱ्या नववर्षाचे आगमणाची तयारी नागरीकांमार्फत सुरु असुन आहे. दिनांक ३१/१२/२०२२ रोजी नागरिक मोठ्या प्रमाणात मद्य प्राशन करुन गाडी चालवित असतात. त्यामुळे अपघात होवुन वाहन चालक व नागरीकांचे जिवीतास धोका निर्माण होत असतो. त्यावर वेळीच नियंत्रण ठेवणेकरीता मा. पोलीस आयुक्त श्री विनयकुमार चौबे यांचे आदेशाने सह पोलीस आयुक्त मनोज लोहिया सो, मा. अपर पोलीस आयुक्त श्री संजय शिंदे सो तसेच पोलीस उपायुक्त काकासाहेब डोळे सो, विवेक पाटील सो, यांचे मार्गदर्शनाखाली पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाचे हद्दीत दिनांक २९/१२/२०२२ रोजी रात्रौ २१.०० ते २४.०० वाजेपावेतो वाहतुक विभागात विशेष नाकाबंदीचे आयोजन करण्यात आले होते. सदर नाकाबंदी दरम्यान मद्य सेवन करुन वाहन चालविणाऱ्या वाहन चालकांवर (ड्रंक ॲण्ड ड्राईव्ह) ६६ केसेस व धोकादायकरित्या वाहन चालविणारे वाहन चालकांवर (रॅश ड्रायव्हिंग) एकुण ६२ केसेस करण्यात आले असुन पुढील दोन दिवशी अशाच प्रकारच्या नाकाबंदीचे आयोजन करुन वाहतुक विभागामार्फत कारवाई करण्यात येणार असल्याने नागरीकांनी मद्य प्राशन करुन तसेच वेग मर्यादेपेक्षा जास्त वेगाने धोकादायकरित्या (रॅश ड्रायव्हिंग) वाहन चालवुन स्वत:चे व इतरांचे जिवीतास धोका निर्माण करु नये अन्यथा त्यांचेवर पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाकडुन कारवाई करण्यात येईल याची नोंद घ्यावी. वाहतुक नियमांचे पालन करुन पिंपरी चिंचवड पोलीसांना सहकार्य करावे असे अवाहन पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयामार्फत करण्यात येत आहे.

(सतिश माने)
सहा.पोलीस आयुक्त,
वाहतुक शाखा,पिंपरी चिंचवड शहर

Scanned with CamScanner

Scanned with CamScanner